www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर   निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील   सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 300   सोमवार दि. 14 जुलै २०२५   किंमत : 2 रु   पृष्ठ : ४

# "स्वतःचं घर हवं म्हणून... पण फसवणुकीच्या जाळ्यात अडकतोय गरीब !"

**- सुनिल शांताराम पेंडुरकर दैनिक युवक आधार**

स्वतःचं छोटंसं घर असावं, ही प्रत्येक सामान्य माणसाची स्वप्नं! मात्र याच स्वप्नाचा गैरफायदा घेत काही ठिकाणी ठगांचा जाळं पसरवलं जातं आहे. "फक्त ५ लाखात चाळीत घर, टायटल क्लीयर, सातबारा, उत्तारा, बँकेचं लोन सहज मिळवा" अशा गोडगोड वळणाच्या जाहिराती युट्युबवर मोठ्या प्रमाणात झळकतात आणि हजारो गरीब, कामगार, निम्नवर्गीय नागरिक या स्वप्नात रंगून नायगाव, विरार, नालासोपारा, दीवा, डोंबिवली, टिटवाळा, कल्याण, वाशी, पनवेल इ. भागात घर घेण्यासाठी धाव घेतात.

मात्र वास्तव भयावह आहे. स्थानिक जमीन मालक आणि बिल्डर मिळून तलाठी, ग्रामपंचायत कार्यालयातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरून बेकायदेशीर चाळी उभ्या करतात. त्या चाळी विकताना बनावट कागदपत्रं, खोटा सातबारा, बनावट टायटल दाखवून ग्राहकांची फसवणूक केली जाते.

काही वर्षांनंतर जेव्हा ही चाळ 'बेकायदेशीर' असल्याचं उघड होतं, तेव्हा याच जमीन मालकाकडून ग्रामपंचायतीत तक्रार होते – "माझ्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम केलं गेलं आहे." प्रशासन त्यानंतर तात्काळ कारवाई करत 'बुलडोझर' चालवतं – आणि गरीबांच्या आशा-अस्वस्थतेखाली गाडल्या जातात.

विशेष बाब म्हणजे, ही सर्व योजना पूर्वनियोजित असून, त्या चाळी हटवल्यानंतर पुन्हा तीच जमीन मालक नव्याने वापरतो – आणि पुन्हा नव्या 'फसवणुकीचा खेळ' सुरू होतो!

ही केवळ फसवणूक नाही, तर एका वर्गाच्या स्वप्नांवर, मेहनतीच्या पैशांवर, आणि जगण्यासाठीच्या लढ्यावर घाव आहे. शासनाने यामध्ये तात्काळ लक्ष घालून अशा बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करावी, यामागे असलेल्या बिल्डर-मालकांच्या टोळ्यांचा पर्दाफाश करावा आणि फसवणूक झालेल्या नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

# कांदा सडतोय आणि बळीराजा रडतोय ! कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर दुहेरी संकट




**नाशिक:** एकीकडे कांद्याला भाव नाही दुसरीकडे चाळीत साठवलेला कांदा खराब होऊ लागल्याने शेतकऱ्यांची इकडे आड-तिकडे विहीर अशी अवस्था झालीये. बदलतं हवामान आणि सततचा पाऊस यामुळे नाशिकमधील कांदा उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडलाय. मे महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या अतिवृष्टीमुळे 50 टक्के कांदा शेतातच खराब झाला. त्यातून उरलेला कांदा भाव वाढेल या आशेनं शेतक-याने चाळीत साठवून ठेवला.मात्र चाळीत साठवलेला कांदाही सडून खराब होऊ लागलाय. नाशिकच्या येवला तालुक्यातील शेतकरी तर अक्षरशः रडकुंडीला आलाय. कष्टानं घाम गाळून जो कांदा पिकवला तो जनावरंही खावू शकत नाहीत अशा अवस्थेत आहे. बालाजी साहेबराव गुंड या शेतक-यावर 500 क्विंटल कांदा उकिरड्यावर फेकण्याची वेळ आलीये.कोसळता बाजारभाव आणि त्यात अस्मानी संकट यामुळे शेतक-याचं गणित पूर्णपणे कोलमडलंय. या संकटात सरकारने मदतीचा हात पुढे करावा अशी शेतकरी आस लावून बसलेत.देशातील एकूण कांदा उत्पादनात राज्याचा वाटा 55 टक्के इतका आहे. मात्र अस्थिर धोरणामुळे कांदा उत्पादक शेतकरी सातत्याने अडचणीत येतोय. त्यात नाफेड आणि NCCFकडून कांदा खरेदीत गैरप्रकार होत असल्याचा आरोप कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंनी केलाय. यासंदर्भात त्यांनी पणनमंत्र्यांशीही चर्चा केलीये.सततच्या संकटांमुळे कांदा उत्पादक शेतकरी मेटाकुटीला आलाय. कधी अस्मानी संकट, कधी सरकारी धोरण यामुळे कांदा उत्पादकांवरील संकटं कमी होण्याचं नाव घेत नाहीयेत. आता शेतक-यांवर आलेल्या संकटात सरकार कशी मदत करणार हे पाहावं लागणार आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

दैनिक युवक आधार
पनवेल ( प्रतिनिधी)

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, खारघर मंडळाच्या वतीने माननीय लोकनेते, माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांचे ७५ व्या वर्षात पदार्पण अर्थात अमृत महोत्सवी वर्ष वाढदिवसनिमित्त रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रायगड जिल्ह्यात सध्या जाणवणाऱ्या रक्ताच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर, खारघर परिसरातील नागरिकांना स्वयंप्रेरणेने रक्तदानाचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिरास पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी विशेष भेट देत, खारघर युवा मोर्च्याच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. तसेच युवा व महिला पदाधिकाऱ्यांचे विशेष कौतुक करत, समाजसेवेत त्यांचा सहभाग प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.

पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही उपस्थित राहून, "मानवतेसाठी व समाजाच्या ऋणातून प्रेरित झालेलं रक्तदान हे अत्यंत पवित्र व निःस्वार्थ सेवा कार्य आहे," असे उद्गार काढले. दानशूर व्यक्तिमत्त्व असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त, आज मला माझं ७५वं रक्तदान करण्याचं भाग्य लाभलं, ही बाब माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आणि समाधानकारक आहे," असे खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमावेळी आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीनभाई पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, अजय बहिरा, गुरुनाथ गायकर, नगरसेविका नेत्रा किरण पाटील, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, पनवेल उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, लि अध्यक्षा साधना पवार, जिल्हा युवा अध्यक्ष मयुरेश नेतकर, खारघर युवा अध्यक्ष नितेश पाटील, सरचिटणीस अक्षय लोखंडे, प्रविण रामजी बेरा, युवा अध्यक्ष आशिष कडू, अक्षय सिंग, समीर कदम, वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, विजय पाटील, संतोष शर्मा, अक्षय सिंग, डॉ. विजय उजलंबे,आदित्य हातगे, योगेश पाटील, मयूर घरत, कोमल शिंदे, दुर्गा बन्सल,अभिजीत देहाडे, सुमित देहाडे, प्रथम पाटील, सार्थक दोरुगडे, दिनेश यादव, अंकुर शर्मा, राहुल शिंदे, ध्रुव गजरा, अमित बोढई, स्नेहल बोढई, वैभव शेजवळ, संदीप माघाडे, शोभा मिश्रा, निर्मला यादव,कुणाल देवकर, मधुमिता जेना व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा मोर्चा, महिला मोर्चा व विविध विभागांतील स्वयंसेवकांनी अथक मेहनत घेतली. हा उपक्रम समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित करणारा ठरला.








# निक गुन्हे शाखेची मोठी कारवाई. मुद्देमाल केला जप्त !

दैनिक युवक आधार
मराठवाडा विभागीय प्रतिनिधीः -राजू शिंदे.
------------
पोलीस ठाणे बदनापुर येथे दिनांक 30/06/2025 रोजी फिर्यादी नामे उध्दव निवृत्ती बनकर वय 38 वर्ष रा. सातेफळ ता. जाफ्राबाद ह.मु. देऊळगावराजा जि. बुलढाणा यांनी पोलीस ठाणे बदनापुर येथे फिर्याद दिली होती की, एक अनोळखी महिला हिने फिर्यादी कडुन QR कोडवर पाच हजार रुपये मागवुन दोन अनोळखी व्यक्तीच्या साह्याने पुर्वतयारी करुन कट करुन फिर्यादीच्या स्कॉरपिओ गाडी मध्ये बळजबरीने घुसुन फिर्यादीस मारहाण करुन बळजबरीने फिर्यादीच्या खिशातील दहा हजार रुपये व ॲपल कंपनीचा आयफोन हिसकावून घेऊन घटना कोणाला सांगितली तर जिवे मारण्याच्या धमक्या दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात एक महिला व दोन अज्ञात आरोपीतां विरुद्ध पोलीस ठाणे बदनापुर येथे गु.र.नं. 235/2025 कलम 309 (4) भा.न्या. सं प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

त्यानुषंगाने दिनांक 11/07/2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे नमुद गुन्ह्यातील अज्ञात महिला व दोन अज्ञातगुन्हेगारांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत व तांत्रिक माहितीच्या आधारे सदरचा गुन्हा हा महिला नामे 1) सपना संतोष निकाळजे वय 22 वर्ष रा. पांग्री उगले ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा. हीने तिचे दोन पुरुष साथिदार यांचे सह केल्याचे निष्पन्न झाल्याने तिस ताब्यात देऊन तिने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने तिचे कडुन 15000 रु रोख ज्यात फिर्यादी कडुन QR



कोडवर मागितलेली 5000 रु व फिर्यादीचे खिशातील बळजबरीने हिसकावलेले 10,000 रु रोख व 80,000 रु किंमतीची फिर्यादीचा एक IPHONE 15 मोबाईल व ओपो कंपनीचा मोबाईल असे एकुण 95,000 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद महिला आरोपीस पुढील तपासकामी पोलीस ठाणे बदनापुर यांच्या ताब्यात दिले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, फुलचंद गव्हाणे, देविदास भोजणे, सागर बाविस्कर, सतिश श्रीवास, आक्रूर धांडगे, कैलास चेके, भागवत खरात, चालक अशोक जाधवर व महिला पोलीस अंमलदार चंद्रकला शडमल्लु, कल्पना बांडे, कविता काकस, अरुणा गायकवाड, सत्यभामा उबाळे यांनी केली आहे

## "आषाढी वारीसाठी मोठ्या भक्ती भावाने आलेले दिंडी व पालखी सोहळे निघाले परतीच्या प्रवासाकडे"

दैनिक युवक आधार
पिलीव प्रतिनिधी : रघुनाथ देवकर
-आषाढी वारीसाठी आलेल्या सर्व साधुसंत व महाराजांच्या दिंडी व पालखी सोहळ्याने आणि भाविक भक्तांनी गोपाळपूर या ठिकाणी झालेल्या गोपाळकाल्यानंतर श्री विठ्ठल -रुक्मिणीमातेचे व राधा-कृष्णांचे दर्शन घेऊन"जातो माघारी पंढरीनाथा तुझे दर्शन झाले आता"असे म्हणत ज्ञानोबा तुकाराम च्या जयघोषामध्ये व टाळ मृदुंगाच्या गजरात परतीच्या प्रवासाला सुरुवात करून श्रीक्षेत्र पंढरपूरहुन आप आपल्या ठिकाणाकडे आनंदी व हसतमुख चेहऱ्याने वाटचाल सुरू केली व "सर्वांना सुखी ठेवा पाऊस पाणी चांगल्या प्रकारे होऊ व सर्व भाविक भक्त व ग्रामस्थांना सुख समाधान लाभो"अशा प्रकारची इच्छा मनात बाळगून "जिकडे तिकडे चोहीकडे आनंदी आनंद गडे"याप्रमाणे सर्व अभाधित राहो अशी अपेक्षा करीत परतीच्या प्रवासामध्ये सहभागी झाले.



## आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर : आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे पनवेल मध्ये विविध आयोजन करण्यात आले, करंजाडे पनवेल येथे मात्र भव्य चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला,करंजाडेत पहिल्यांदा एवढी भव्य चित्रकला स्पर्धा दमदार आमदार विक्रांतदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्रिधाम मंदिर करंजाडे येथे रविवारी 13,जुलै रोजी अतिशय सुरेख,उत्कृष्ट चित्रकला स्पर्धा सकाळी संपन्न झाली. करंजाडेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना गुणांना वाव मिळावा यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले होते.
या स्पर्धेतील विषय चंद्रयान/पृथ्वीचे संवर्धन,अयोध्या मंदिर,पंढरीची वारी,विश्वगुरु भारत,मिशन सिंदूर हे होते.तसेच विक्रांतदादा पाटील यांच्या



वाढदिवसानिमित्त 108 दिवे लावून महिलांनी शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त "सन्मान मातृशक्तीचा" करंजाडेतील अंगणवाडी सेविका यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत करणारे युवा महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या सर्व सहकाऱ्यांचे आमदार विक्रांतदादा पाटील यांनी कौतुक केले. वाढदिवसानिमित्त आमदार विक्रांतदादा पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व जनतेला मार्गदर्शन करत पुढेही जनतेची कामे करत राहू असे आश्वासन त्यांनी दिले.

## पिलीव तालुका माळशिरस येथील "श्री विठ्ठल -रुक्मिणी मंदिरामध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने भाविकांनी केली बहुगर्दी"

दैनिक युवक आधार
पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर
-माळशिरस तालुक्यातील पिलीव याठिकाणी मुख्य पेठेत असलेल्या श्रीविठ्ठल- रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीचे औचित्य साधून दर्शनासाठी सकाळपासूनच भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात बहुगर्दी झाली होती, या दिवशी मंदिरामध्ये महिला भजनी मंडळ व पुरुष भजनी मंडळ यांनी अतिशय सुश्राव्य अशा भजनाच्या कार्यक्रमाने भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. आषाढी एकादशीच्या निमित्ताने असंख्य भाविक भक्तांनी मनोभावे दर्शनाचा लाभ घेतल्याचे दिसून आले.



## युनिफाईट राज्यस्तरीय स्पर्धेत रायगड जिल्हा प्रथम क्रमांकाचे मानकरी



दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी : सोलापूर येथे झालेल्या १२वि युनिफाईट राज्यस्तर स्पर्धेत रायगड जिल्हा प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहे सोलापूर सिंहगड इंनस्टुट येथे 12 व्या राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेचे आयोजन युनिफाईट वेलफेअर आसोशिएन महाराष्ट्र व सोलापूर युनिफाईट असोशिएशन ने दिनांक 12 व 13 जुलै 2025 रोजी केल्या होत्या ह्या स्पर्धेस महाराष्ट्रातुन जवळ जवळ 20 जिल्ह्यातील खेळाडुनी सहभाग घेतला होता. ह्या स्पर्धेमध्ये विजेते खेळाडू खालीलप्रमाणे __सुवर्ण पदक__ वीर मुंबरकर सोहम पडवळ वेदांत धोत्रे श्लोक पाटील समित घावटे पार्थ बागवे आदर्श कानु समर्थ शेंबडे हेम लाला वेदांत चव्हाण कथिर दुराई सार्थक कांबळे यशोधन सोनकांबळे आर्यन शिंदे साक्षी मर्ढेकर समीक्षा परब वेदिका मोरे रिद्धी गायकवाड श्रुती वायभसे ज्ञानेश्वरी शेळके __रौप्य पदक__ शिवप्रेम जुवाले रुद्र वाव्हळ वैष्णवी मर्ढेकर __कांस्य पदक__ अर्णव वाघमारे विवेक रावल तनिष्क राहतवाल अंश पाटील शिवांश चंदनशिव आयुरी धुमाळ आस्था याद व ह्या स्पर्धेत खेळाडुना मोलाचे मार्गदर्शन लाभले ते म्हणजे रायगड जिल्हा प्रतिनिधी युनिफाईट आसोशिएन व मुख्या प्रशिक्षक प्रशांत गांगर्डे सर याचे , तसेच इतर प्रशिक्षक रविंद्र म्हात्रे ( पप्पू सर) रोहीत भोसले सर, आलोक निर्मल सर, यशसस्वि खेळाडूंचे युनायतेड शोतोकान कराटे असोशिएशन, रायगड युनिफाईट असोशिएशन, ह्यांच्या कडून अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्या बद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. ह्या स्पर्धा यशसस्वि करण्यासाठी महाराष्ट्र युनिफाईटचे अध्यक्ष संतोष खंदारे सर, सचिव मंदार पनवेलकर सर सोलापूर युनिफाईट चे अध्यक्ष इंगळे सर, सचिव बाळगे सर तसेच खजिनदार इकबाल शेख सर यांनी मेहनत घेतली

# आर्थिक स्वातंत्र्य अन् कर्जमाफीचे नावावर, नौटंकीचा तमाशा !

**लेखक -धनंजय पाटील काकडे**
**(ज्येष्ठ साहित्यिक व शेतकरी नेते)**

शेतकरी संघटनेची कर्जमुक्ती म्हणजे शेतकऱ्यांनी स्वतःसाठी पुकारलेले आंदोलने, व राजकीय पक्षांनी पुकारलेले कर्जमाफी आंदोलन म्हणजे पुढील निवडणुकीसाठी राजकीय व्यवस्थेची तयारी करणे. हा जर फरक शेतकऱ्यांना व जनतेला कळत नसेल तर आर्थिक स्वातंत्र्य कसे मिळणार ? प्रश्न असा आहे ,आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे काय ? तर शेतकऱ्यांना विरोधी कायद्याच्या चाकोरीत अडकवून ठेवून, चुकीच्या आर्थिक धोरणाच्या माध्यमातून जखडून ठेवलेला शेतकरी आणि शेतमालाची व्यवस्था आहे. केंद्र शासनाच्या चुकीच्या व्यवस्थेतून मुक्त करणे, म्हणजेच शेतमालाची आयात - निर्यात ही देश पातळीवर नव्हे तर ही जागतिक पातळीवर, बाहेरील देशात शेतीतील कच्च्या मालाची मुक्त व्यापार पेठ, देवाण-घेवाण करणे गरजेचे आहे. यालाच आपण खुली अर्थव्यवस्था म्हणतो.

शेतकऱ्यांना कापूस बाहेर पाठवण्यासाठी राज्य बंदी होती. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आंदोलने करून ती राज्य बंदी, झोन बंदी उठवून संपूर्ण भारतात कापूस पाठवण्यासाठी महाराष्ट्र व केंद्र सरकारवर दळपण आणले होते व कापूस फेडरेशन ही व्यवस्था शेतकरी आंदोलनामुळे मुक्त झाली. तसेच बहिरम (ता.चांदूरबाजार. जिल्हा.अमरावती) येथे त्याकाळी शेतकऱ्यांनी उठाव करून झोन बंदी तोडली. व कापूस बैलगाड्या मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश , गुजरात, मध्ये पाठविल्यात म्हणजेच कापूस उत्पादक शेतकरी हा नुसते एका राज्यापुरता बंदिस्त केला होता. मग जागतिक पातळीवर जर निर्यात झाली तर शेतमालाचे भाव जगात जे आहे ते शेतकऱ्याला मिळतील ना ? पण त्यासाठी फार मोठा संघर्ष व आमदार-खासदारांचा भरणा राज्यात व केंद्रात शेतकऱ्याच्या बाजूने बोलणारा लागेल ना ? आज तर जनता उद्योगपतीचे सरकार चालवीत आहे.ही गोष्ट फक्त रस्त्यावर उतरून आंदोलनातून शक्य होणार नाही ,तर तुम्हाला ती हाऊस मध्ये तुमचे प्रभावी आमदार- खासदार असल्याशिवाय अन् रेटून धरल्याधिवाय होणार नाही, ती व्यवस्था बदलणार नाही. त्यांचे राजकीय पक्ष हे गाव लीडर व राजकीय दलालाच्या मार्फत उपद्रव करतात. म्हणजेच तुम्हाला शेतमाल जागतिक बाजारपेठेत नेण्यासाठी संघर्ष करावा लागेल, शेतमालाला भाव कमी द्यायचे, व कर्ज थकीत ठेवायचे,हा गोरख धंदा आहे. कर्जमाफी म्हणजे सतत शेतकऱ्यावर लादलेली गुलामी आहे.

शेतीमालाला भाव कमी द्यायचा आणि बँकेमार्फत पैसा पुरवठा करून शेतकऱ्यांना उपकार केल्याचे दाखवायचे हेच वर्षानुवर्षे चालत आले आहे. जोपर्यंत शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही तोपर्यंत कोणतेही बँकेचे पिक कर्ज देणे घेणे करू नये ,कारण हे सर्व कर्जे अनैतिक आहेत. ही सर्व सुलतानशाही वापरली जात आहे. स्वातंत्र्य काळानंतर जनता कापसाला पांढरं सोनं म्हणायचे, म्हणजेच कापूस व पिवळे दागिने , सोने यांचे भाव सारखे होते. मग पांढरा सोने (कापसाचे) भाव कमी झाले व पिवळं सोन्याचे भाव जागतिक बाजारपेठेत वाढले.म्हणजेच शेतकऱ्याला जागतिक बाजारपेठेचे भाव मिळणे व त्यातून समृद्धी तयार होणे ,यालाच खऱ्या अर्थाने आर्थिक स्वातंत्र्य म्हणतात. गेल्या 75 वर्षात आपण काँग्रेस व बीजेपी या सरकारला सतत निवडून पाठविले, परंतु त्यांनी ही व्यवस्था बदलविली नाही. शेतकरी संघटनेने ही व्यवस्था तयार केली होती , परंतु शेतकरी संघटनेला निवडणुकीत शेतकरी आणि मजुरांनी सहकार्य न केल्यामुळे शेतकरी आत्महत्या सतत वाढत गेल्या, व पुढेही वाढत राहणार आहे. परंतु शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार आयात,- निर्यात धोरण चुकीचे वापरुन शेतकऱ्यांना सतत कर्जबाजारी ठेवते ही एक मुळात मेख वापरीत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना स्वतःची कंबर कसावी लागेल. शेतकऱ्यांना स्वतंत्र व्यवस्था तयार करावी लागेल , बापाचे ज्याप्रकारे, व ज्या परिस्थितीत शोषण झाले . हे त्यांच्या मुलांनि बघितले आणि शेती ही परवडत नाही म्हणून तो मुलगा शहराकडे वळला. तर खरे कारण हे शेतकऱ्याला शेतीमालाचे भाव न दिल्यामुळे शेतकरी समृद्ध झाला नाही म्हणून नाईलाजाने त्याचा मुलगा पोट भरण्यासाठी शहराकडे जात आहे. आज शहरी संख्या वाढून शहरी आमदार-खासदार वाढलेत. त्यामुळे निर्णय शहरी विकासाच्या बाजूने जास्त होतात. व तिथेच खर्च जास्त होतो.

मागे मराठा आंदोलन हे फक्त विधानसभेपुरतेच होते. आणि यासाठी काही नेते, राजकीय दलाल हे सुपाऱ्या घेऊन काम करीत असतात. निवडणुकीचे वारे वाहत असताना असे वातावरण तयार करणे, हे महाराष्ट्राला काही नवीन नाही. या अगोदर असे अनेक आंदोलने महाराष्ट्राने पाहिलेली आहे. परंतु आताचा कर्जमाफी हा मुद्दा, शेतकऱ्यांच्या आताच्या सध्याच्या अडचणीमुळे त्यांच्या जगण्याच्या निगडित आहे. शेतकरी - शेतमजुरांचे बेहाल निवडणुकी झाल्यानंतर कोणीही पुसायला येणार नाही. ह्या छत्र्या फक्त निवडणुकीच्या पावसाळ्यातच उगवतात , सामान्य शेतकऱ्यांच्या लक्षात येऊन सुद्धा ते आपला राजकीय हट्ट सोडायला तयार नाही, हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. स्वतःच्या जगण्यासाठी अर्थव्यवस्था मजबूत करण्यापेक्षा राजकीय विचाराने जगणे, आणि त्यातून द्वेष निर्माण करणे, हीच जनतेतील गंभीर समस्या तयार झाली.

जेव्हा - जेव्हा महाराष्ट्रात निवडणुकी येतात, तेव्हा हे असे फुगारे , फुटवे येत असतात ,आज पर्यंत एकही शेतकरी आत्महत्या वर आमदारांनी राजीनामा दिला नाही, हे सर्व सत्ताधीश लालची पोट भरू व्यवस्था स्वतःसाठी सांभाळत आहे. जनतेला जरी कर्जमाफी झाली पाहिजे ,असे नक्कीच वाटत असते, कारण तो निराधार व निराश्रीत झाला असल्यामुळे, त्याच्या बाजूने जो कोणी बोलेल त्याला त्याचा आधार वाटत असतो, व हे राजकीय बांडगुळ त्याचा असाच फायदा घेत 75 वर्षे यांनी सत्ता भोगली ,असे असेल तरी या कर्जमाफीच्या नावातून सत्ता तयार करणे ,हा सर्वात मोठा यांचा उद्देश आहे. अशा राजकीय बांडगुळांना जरी समाजसेवी व्यवस्था म्हणत असंले तरी ती मात्र शंभर टक्के राजकीय व्यवस्था असते,म्हणूनच नौटंकी आंदोलनमुळे तरुण मुलांना पाण्याच्या टाकीवर, झाडावर चढने, नदीच्या पाण्यात अर्ध नग्न आंदोलन करणे आवडते.हे असे विचारपूर्वक आंदोलन नसतात, तर समाजाला घुमाविनाचा प्रकार आहे. अश्या प्रकारे महाराष्ट्रात ठिकठिकाणी राजकीय दलाल पेरून ठेवले आहे. या सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत दीसणार आहे. कर्जमाफीला कोणताही शेतकऱ्याचा आणि जनतेचा विरोध नाही ,परंतु सोंग काढून तमाशा करणाऱ्याला विरोध आहे. कर्जमाफीचे नावावर दुसरे कोणतेही सरकार स्थापन झाले , तरी शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत. शरद पवार सरकार हे सुद्धा चारदा मुख्यमंत्री राहिल्यानंतर ते स्वतः शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकले नाही ? कारण त्यासाठी कायदे रद्द व दुरुस्त करावे लागतील. सत्तेत आल्यास आम्ही एकही शेतकरीआत्महत्या होऊ देणार नाही, हे किमान काँग्रेस ,राष्ट्रवादी ,शिवसेना, बीजेपी पक्षांनी जाहीर करावे व नंतरच मतदान घ्यावे? असे का ठामपने विश्वासाने कोणताच पक्ष जाहीर करीत नाही? सत्ता भोगून हड्ड्या मसणात गेले तरी उचापती मात्र संपल्या नाही. कारण शेतकऱ्यांच्या. डोक्यावरून भरपूर पाणी , वाहून गेले आहे. काँग्रेस, बीजेपी या दोन्ही व त्यांच्या आघाड्यातील राजकीय पक्षांना शेतकरी दुरुस्त करायचा नाही, तर त्याचा उपयोग घेऊन फक्त सत्ता भोगायची आहे. राजकीय सत्तेतील पडद्यामागची ही सर्व खेळी आहे हे आता लपून राहिलेली नाही.

जातीचे नावावर , हिंदू - मुस्लिमचे दंगले होऊन, बॉम्बस्फोट करून अनेकांचे बळी जात आहेत, यालाच कारणीभूत राजकीय सत्ता आहे. राजकीय व्यवस्था वाचविण्यासाठी मानव हत्याचे देशद्रोही खटले सत्ताधीशावर लावणे गरजेचे होते. राजकीय आंदोलन पेटवून निष्पाप लोकांचे बळी घेतले जात आहे. मनुष्य वधाचे खटले दाखल करून, सत्ताधीशांना आता अटकाव केल्याशिवाय अशा उंचावती थांबू शकणार नाहीत , एवढे मात्र निश्चित. आजचे सत्ताधीश सरकारच्या तिजोऱ्या लुटून मस्तवाल, गुंडे व दरोडेखोर बनले ,अश्या नियोजनपूर्वक उचापती उखरून शेतकऱ्यांना त्रास देत राहील, तर जनता सुद्धा आता सहन करणार नाही. आता उठाव करण्यासाठी आंदोलनासाठी यांना शेतकऱ्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग दिसत नाही. जातीचे भांडण लावून संपले, मराठा झाले , बौद्ध समाजांचे भांडणे लावून संपले, आता फक्त एकच आर्थिक दृष्टिकोनातून कर्जमाफी हेच एक गांजर ,आता जनतेत लागणारे भांडण लावने आहे. आणि या राजकीय कर्जमाफीचा फायदा सत्ताधीश व विरोधक दोघेही घेण्याच्या तयारीत आहे. जनतेला कर्जमाफी साठी आंदोलने करण्याची गरज काय ? जनतेला बेवकूफ बनवून सत्तेत जाणे हा एवढाच या मागचा फार मोठा उद्देश आहे? .म्हणूनच कर्जमाफी हे फक्त राजकीय नौटंकी आंदोलन आहे. म्हणजेच काँग्रेस व भा.ज.पा. हे दोन्ही राजकीय पक्ष शेतकऱ्याचे शत्रू आहेत. जय शेतकरी.... जय वारकरी....
जय कष्टकरी..... जय गुरुदेव.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल ( स्वायत्त ) येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधीजनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) येथे प्रथम, द्वितिय, तृतीय वर्ष पदवी, पदव्युत्तर वर्गातील व विद्यावाचस्पती (पी.एच. डी.) पदवी प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, रविवार दि. १३ जुलै २०२५ रोजी सकाळी ११: ०० वाजता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे स्फुर्तिस्थान स्व.चांगु काना ठाकूर साहेब यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव मा. डॉ. प्रसाद महादेव कारंडे व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. आमदार श्री. प्रशांत ठाकुर आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन मा.श्री.वाय.टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. श्री. अनिल भगत, पनवेल महानगरपालिकेच्या माजी उपमहापौर मा. सिताताई पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. श्री. संजय भगत, मा. श्री. स्वप्नील ठाकूर, पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका मा.हेमलता म्हात्रे, मा. माजी नगरसेवक श्री. मनोहर म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव तसेच महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पनवेल चे प्राचार्य मा. डॉ. गणेश ठाकूर, मा. ॲड. राहुल घरत, मा. श्री. अतुलशेठ भगत व संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली .

स्व.चांगु काना ठाकूर यांचे पुण्यस्मरण आणि त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी आयोजिलेल्या या सोहळ्याची सुरवात मंत्रमुग्ध करणाऱ्या ईशस्तवन आणि स्वागतगीताने झाली. त्यानंतर प्राचार्य



मा. प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्याचबरोबर आपल्या भाषणामध्ये महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. या कौतुक सोहळ्यामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविले. यानंतर पनवेलचे कार्यसम्राट आमदार तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. श्री. प्रशांत ठाकूर यांनी उपस्थितांना संबोधित करताना भविष्यातील संधींचे सोने करण्यासाठी येणाऱ्या आव्हानांवर स्वार होऊन पुढे जाण्याचा संदेश देत, जागतिक पातळीवरच्या आव्हानांसाठी सज्ज राहण्यास सांगितले.

प्रस्तुत सोहळ्याचे मुख्य अतिथी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद महादेव कारंडे यांनी उपस्थितांना संबोधित करताना, भारतीय संस्कृतीने शिकवलेल्या उदात्त विचारसरणीचा आपल्या अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान प्रणालीच्या माध्यमातून समावेश झाला ही अत्यंत महत्वपूर्ण गोष्ट आहे, तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील करिअरची दारे खुली झाली आहेत व त्याचा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ करून घ्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या. मा. श्री. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशुन सांगितले की प्रत्येक विद्यार्थ्यांने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे व संघर्ष हाच यशाचा मार्ग आहे . त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थांना सांगितले की हि पदवी घेऊन शांत राहू नका तर पुढच्या पदव्या पण प्राप्त करा तसेच विद्यार्थांच्या पुढच्या भविष्यातील वाटचालींसाठी शुभेच्छा दिल्या व कौतुक केले . या सोहळ्यामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे चांगु काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील यांनी कौतुक केले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण कक्षाचे प्रभारी डॉ. एस. एन. परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. आर.डी.म्हात्रे यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. ए. व्ही. पाटील, प्रा. एन. एच. कडु तर आभारप्रदर्शन डॉ. एस. एन. परकाळे यांनी केले, तसेच या कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब, अध्यक्ष मा. श्री. अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन मा. श्री. वाय. टी. देशमुख, पनवेलचे मा. आमदार श्री. प्रशांत ठाकुर व संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे यांनी सदर उपक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुक केले.

## प्रामाणिक रिक्षा चालक सन्मान श्री दिलीप किसनराव आमले जिल्हाध्यक्ष शिव वाहतूक सेना

**दैनिक युवक आधार,- नवी मुंबई** : शिव वाहतूक सेना,



रिक्षा चालक मालक सेवाभावी संस्था जिल्हाध्यक्ष श्री दिलीप किसनराव आमले (आपला माणूस) रिक्षा चालक नेते यांच्या वतीने नेहमीच रिक्षा स्टँडवर जाऊन रिक्षा चालक यांनी प्रामाणिकपणे प्रवासी यांचे राहिलेले सामान, बाहेरच्या राज्यातून आलेले प्रवाशांना मिटर, जेष्ठ नागरिक,अध, अपंग, गरोदर स्त्रिया, रिक्षा रांगेत उभे करणे, लायसन्स बच, पेपर, गणवेश परिधान करावा,व्यसन करू नये अशी जनजागृती अभियान राबविण्यात येत त्यांचे हजारो रिक्षा चालक यांच्यावर परिणाम होतात व प्रवासी यांचे राहिलेले सामान प्रामाणिकपणे परत करत आहेत आज आमचे सभासद सानपाडा सेक्टर 5 येथून महिला प्रवासी प्रवास करत असताना महागडा मोबाईल फोन विसरल्या तो मोबाईल श्री बाबुराव यमकर रिक्षा चालक यांनी प्रामाणिकपणे त्या ताईला रिटर्न केला त्याबद्ल रिक्षा चालक नेते श्री दिलीप किसनराव आमले जिल्हाध्यक्ष यांनी रिक्षा चालक यांना प्रामाणिक रिक्षा चालक सन्मान पत्र दिले असेच सर्व रिक्षा चालक यांनी प्रामाणिकपणे आपला व्यवसाय जबाबदारीची जाणीव ठेवून करावा

# तळा ज्युनियर कॉलेज व गो म वेदक विद्यामंदिरच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा संपन्न

दैनिक युवक आधार
तळा वार्ताहर : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व गो म वेदक विद्यामंदिर तळाचे सन २०२४- २५ मधील इयत्ता १० वी व १२ वीचे गुणवंत विद्यार्थी आणि ऑलिम्पियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री महादेव बैकर, डॉक्टर सतिश वडके, मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते.



साळवे जान्हवी रमेश, ठसाळ संस्कृती विजय, शिर्के श्रावणी योगेश, शिगवण प्रांजल हेमंत, कासार सार्थक राकेश, फुलारे नैतिक मोरेश्वर, करदेकर तजिन कमरुद्दीन, वेदक परमेश्वरी प्रशांत, गौतम गंगोत्री पुजारी, तळकर मानव संतोष, गिरी तनिष्क संजय, चोरगे सुविधा लक्ष्मण, शिंदे मोहन वसंत, तळकर कस्तुरी उल्हास, कजवले प्रतिक प्रकाश, जायस्वाल जान्हवी मुकेश, चव्हाण तेजस तानाजी, भोनकर ओमकार प्रदिप, ढेबे रेश्मा मनोहर, मंचेकर विद्या विलास, सकपाळ पारस शशांक, अडागळे सुनिल टोपाजी, शिगवण लिलावती लक्ष्मण, कांढरे मंदिरा नरेश, वेवल रिहान नसिर, पांडव प्राची रोहिदास, मोरे मिताली यशवंत आदी विद्यार्थ्यांना रोख रक्कम व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ऑलिम्पियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे व श्री विठ्ठल रेणूकर यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. दरम्यान शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, संस्था अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी व मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात दर्जेदार शिक्षण दिले जात असल्याने शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध क्षेत्रात राज्य पातळीपर्यंत संस्थेचे नाव पोहचवत असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# राजेश सावित्री काशप्पा होट्टी यांचे सी . ए. परिक्षेत सुयश



दैनिक युवक आधार
नवी मुंबई वार्ताहर : चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेचा परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. कळंबोली ,नवी मुंबई येथील राहणारा राजेश सावित्री काशप्पा होट्टी यांना यश मिळाले आहे राजेश सीए ची परीक्षा पास होण्यास फक्त चार वर्ष लागले त्याने प्रतिकूल परिस्थितीत असतानाही जिद्दीने अभ्यास केला व चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन करून आई वडिलांचे स्वप्न साकार केले मुलाला सीए करायचा असा ध्यास त्यांच्या आई वडिलांचा होता त्यासाठी वडिलांनी अहोरात्र कष्ट केले. मुलानेही आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली यशासाठी संघर्ष करताना धीर सोडला नाही. अखेर आज त्याला उद्दिष्ट गाठण्यात यश आले आहे. राजेश लहानपणासून जिद्दी आणि हुशार होता, राजेशने प्राथमिक शिक्षण कळंबोली येथे झाले. मुंबई विद्यापीठाच्या के एल कॉलेज मधून वाणिज्य शाखेची पदवी घेतल्या नंतर सी.ए. होण्याचा दृढनिश्चय केला. रात्रंदिवस अभ्यास करून ध्येया पर्यंत पोहचण्यासाठी मनाशी जिद्द बाळगली. त्याच्या यशाने आई-वडिलांच्या आनंदासमोर गगन ठेंगणे झाले.त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या संदर्भात ही परीक्षा पास झालेला राजेश सावित्री काशप्पा होट्टी यांच्याशी संपर्क साधला असता त्याने सीए परीक्षा पास होण्यासाठी मला फक्त चार वर्ष लागले असल्याचे सांगितले.

# विलासराव कोळेकर यांचा मुस्लिम एज्युकेशन सोसाटीच्या वतीने सत्कार

दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर) दि मॉडेल इंग्लिश स्कुलचे मुख्याध्यापक श्री विलासराव कोळेकर यांना भारतरत्न डॉ.ऐ. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय स्तरावरील आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सैतवडे येथील मुस्लिम एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सैतवडे ( गुम्बद ) सरपंच सौ. उषा सावंत, सैतवडेचे (बोरसई ) साजीद शेकासन, जांभारीचे सरपंच आदेश पावरी, इरा इंग्लिश मिडीयम स्कुलचे मुख्याध्यापक इमरान अंतुले, व मुस्लिम एज्युकेशन सोसायटीच्या वतीने रहीम माद्रे यांनी बुके, शाल, भेटवस्तू तसेच सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी इमरान अंतुले, आदेश पावरी, सौ.उषा सावंत, रहीम माहे, राजेंद्र कदम व काही विद्यार्थ्यानीही यावेळी मनोगत व्यक्त केले. श्री कोळेकर सर यांनी मॉडेल स्कुल नावाप्रमांणेच मॉडेल शाळा केली आहे, सतत नव नवे उपक्रम,शाळेची वाढलेली गुणवत्ता, विद्यार्थ्यांची सर्वच ठिकाणी सुरु असलेली गरुडभरारी ही कौतुकास्पद आहे असे सर्वच मान्यवरांनी स्पष्ट केले.सत्काराला उत्तर देताना श्री कोळेकर म्हणाले हे यश माझे नसुन उत्तम सहकार्य करणा-या संस्थेचे, सर्वोत्तम अध्यापन करणा-या सर्व शिक्षकांचे, प्रयत्नवादी विद्यार्थ्यांचे, आणि प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभाग घेणा-या पालक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आहे असे नमूद केले. तसेच पालकांप्रमाणेच परिसरातील



सर्व ग्रामपंचायतीचे व नागरिकांचाही नेहमीच सहकार्याचा हात असतो, त्यामुळेच आज शाळेची चौफेर प्रगती झाली. या समारंभास मकबुल पारेख, संस्थेचे सदस्य हशमत निवेकर, रज्जाक फकीर तसेच राजू सावंत आदी ही उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुमान पारेख यांनी केले. सुत्रसंचालन विनोद पेढे यांनी केले,तर आभार अविनाश केदारी यांनी मानले.

# खांदा कॉलनीत शिवसेना तर्फे भगव्या सप्ताहाच आयोजन सेवानिवृत्त लोकांचा नागरी सत्कार

दैनिक युवक आधार
खांदा कॉलनी प्रतिनिधी : खांदा कॉलनीत शिवसेनेतर्फे भगव्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या सप्ताहा मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यात शासकीय दाखले वाटप जेष्ठ नागरिकांचा सत्कार तसेच सेवानिवृत्त नागरिकांचा सत्कार आयुष्यमान कार्ड चे वाटप अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता खांदा कॉलनी शिवसेना अध्यक्ष शिवाजी थोरवे यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याच कार्यक्रमात 13 जुलै रोजी खांदा कॉलनी श्रीकृपा हॉल येथे सेवानिवृत्त झालेल्या




लोकांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला शिवसेना महानगरपालिका जिल्हा अध्यक्ष रामदास शेवाळे व तालुका अध्यक्ष रूपेश ठोंबरे विभागप्रमुख दत्ता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली या कार्यक्रमात शासकीय सेवा देणाऱ्या देशपातळी व राज्य पातळीवरील नागरीकांचा सत्कार करण्यात आला जवळ जवळ 500 जणांचा सत्कार यावेळी करण्यात आला यात मिलिटरी ऑफिसर नेव्ही ऑफिसर पोलिस कर्मचारी शिक्षक व विविध शासकीय सेवेत काम करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी यांचा समावेश होता या कार्यक्रमात बोलताना रामदास शेवाळे म्हणाले की शासकीय सेवेतील अनुभव निवृत्तीनंतर लोकांच्या उपयोगी पडू शकतो म्हणून सामाजिक बांधिलकी म्हणून आपण कुठल्या ने कुठल्या पक्षाशी जवळीक ठेवून काम करत रहा तुमच्या कामाचा अनुभव जनतेला होऊ शकतो या कार्यक्रमात आभार मानताना शिवाजी थोरवे यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहील्या बद्दल सर्व खांदा कॉलनीतल सेवानिवृत्त कर्मचारी वर्गाचे आभार मानले व निवृती नंतर आपल्याला ज्या काही समस्या उद् भवतील त्या शिवसेने तर्फे सोडवण्याचे आश्वासन दिले व शिवसेना अध्यक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार जनतेची सतत सेवा करत राहू असे आश्वासन उपस्थित जेष्ठ नागरिकांन समोर दिले

# 12 म्हशी व 6 रेड्यांसह आयशर टेम्पो असा 15 लाखाचा मुद्देमाल जप्त; एक अटकेत नागोठणे पोलिसांची कारवाई

दैनिक युवक आधार
नागोठणे वार्ताहर : पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील आयटीआय कॉलेज समोर शनिवार 12 जुलै रोजी सकाळी 7.00 वाजण्याच्या सुमारास आयशर टेम्पोमध्ये दाटीवाटीने भरलेल्या 12 म्हशी व 6 रेडे नागोठणे पोलिसांनी पकडले असून एकुण 15 लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. या गुन्ह्यात एका आरोपीला अटक केले आहे.नागोठणे पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, शनिवार 12 जुलै रोजी सकाळी 7.00 वाजण्याच्या सुमारास मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील आयटीआय कॉलेज समोर MH 03 DV 8021 या आयशर टेम्पोची तपासणी केली असता त्यामध्ये चोरीच्या दाटीवाटीत कोंबलेल्या 08 ते 10 वयोमानाच्या 07




काळ्या रंगाच्या म्हशी व 05 रेडकू प्रत्येकी अंदाजे कीं. 20,000/- असे 2,40,000\- व दीड ते दोन वयोमानाच्या 05 म्हशी व एक रेडकू प्रत्येकी अंदाजे कीं.10,000/- असे 60,000/- तसेच आयशर टेम्पो अंदाजे किंमत 12,0000/- असे एकुण 15,00,000/- चा मुद्देमाल जप्त केला असून टेम्पो चालक मोसिन आसम महमद कुरेसी रा. गोवंडी – मुंबई याला अटक करण्यात आली आहे. सदरील जनावरांची पशू धन वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सहा. पो.नि.सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय राजहंस नागदिवे करीत आहेत.

# आमदार.विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल विधानसभा क्षेत्रात सामाजिक उपक्रमांची मालिका; 'बुके' नव्हे 'बुक' संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा



दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर): आमदार विक्रांत दादा पाटील यांचा वाढदिवस यंदाही सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. पनवेल विधानसभा क्षेत्रातील कामोठे, कळंबोली, खारघर, नवीन पनवेल , आसुडगाव, खांदा कॉलनी, तळोजा व करंजाडे या ठिकाणी विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले

"बुके नव्हे, बुक" या संकल्पनेतून वाढदिवस साजरा करत आ. विक्रांत पाटील यांनी एक सकारात्मक संदेश दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक उपक्रमांची जी मालिका राबवली गेली, त्यामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. कामोठे येथे मोफत दंत तपासणी व आरोग्य शिबिर, खांदा कॉलनी येथील मोफत आरोग्य व दंत चिकित्सा शिबिर येथे नागरिकांची मोफत एनजॉग्रफी एन्जोप्लास्टी ( हृदय शस्त्रक्रिया) , तर ज्येष्ठ नागरिकांसाठी माधवबाग खोपोली येथे आरोग्य सहल आयोजित करण्यात आली. या शिबिरांच्या माध्यमातून कामोठे परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सुविधेचा लाभ घेतला. या आरोग्य शिबिराचे आयोजन युवा महाराष्ट्र प्रतिष्ठान, स्वप्निल काटकर, तुषार साळुंखे, संदीप मोहिते ,हरिदास जी वणवे व सहकारी यांनी केले. कळंबोली येथे प्रभुदास भोईर यांच्या पुढाकाराने वाहनचालकांना मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले. यामध्ये हेल्मेटचा वापर करून सुरक्षित प्रवास करण्याचा संदेश देण्यात आला. नवीन पनवेल येथे टेबल टेनिस स्पर्धा, तसेच इयत्ता १०वी व १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी 'गुणगौरव व प्रेरणादायी मार्गदर्शन सोहळा' आयोजित करण्यात आला होता. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करत त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणारा कार्यक्रम सुसंवाद आणि सकारात्मकतेने भरलेला होता. तसेच तळोजा फेज – 2 वासियांकरिता खारघर रेल्वे स्टेशन ते केदार गृह संकुल सोसायटी या NMMT बस सेवेचा शुभारंभ देखील या वेळी करण्यात आला. आमदार विक्रांत दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त करंजाडे येथे आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेचे आयोजन ज्वालासिंह देशमुख, प्रथमेश पुंडे, आशिष साबळे आणि सहकाऱ्यांच्या पुढाकाराने करण्यात आले. तसेच करंजाडे येथे भव्य रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते, ज्याचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. आसूडगाव येथे शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शालेय साहित्य किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन रणजित देशमुख आणि सहकाऱ्यांच्या माध्यमातून यशस्वीरित्या पार पडले. आमदार विक्रांत दादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत खांदा कॉलनी येथील सकल मराठा समाजातर्फे इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि प्रेरणादायी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी योग्य दिशा देण्यात आली. खारघर येथे समीर कदम यांच्या पुढाकाराने 'फुटबॉल चषक स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये परिसरातील अनेक क्रीडाप्रेमींनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. खास मातृ शक्तीसाठी 'होम मिनिस्टर –खेळ रंगला पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन नवीन सुधागड शाळा, कळंबोली येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिला भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्री. देवीदास खेडेकर आणि सहकाऱ्यांनी या उपक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन केले. आमदार विक्रांत पाटील यांच्या मंगल अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त मोफत छत्री वाटप, महिला भगिनींना धान्य किट वाटप, रिक्षा चालकांना सीएनजी कूपन वाटप, तसेच विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप व शालेय वस्तूंचे वाटप मंत्री गणेश नाईक, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनाबद्दल बोलताना मंत्री गणेश नाईक म्हणाले, "विक्रांत पाटील विधान परिषदेत अभ्यासपूर्ण मुद्दे मांडणी करत असून, नागरिकांचे प्रश्न सातत्याने प्रभावीपणे मांडत आहेत."महाराष्ट्रभर पक्ष संघटनाच्या विस्तारासाठी आणि भारतीय जनता पक्षाच्या बळकटीकरणासाठी विक्रांत पाटील अत्यंत सक्रिय भूमिका बजावत आहेत." त्यांच्या कार्यशैलीमुळे त्यांचे भविष्य निश्चितच उज्वल आहे. खासदार रामशेठ ठाकूर यांनी "विक्रांत पाटील हे नम्र स्वभावाचे, सर्वांना आपलेसे करणारे असे एक लोकाभिमुख युवा नेते आहेत. पनवेल विधानसभा क्षेत्रातील विविध प्रश्न ते विधान परिषदेत अभ्यासपूर्वक, सातत्याने आणि प्रभावीपणे मांडत आहेत."असे उद्गार रामशेठ ठाकूर यांनी यावेळी काढले. पनवेल विधानसभा क्षेत्रात एकाच दिवशी सामाजिक उपक्रमांची ही मालिका राबविणे ही एक सामाजिक चळवळच ठरली असून, या उपक्रमांना नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. खऱ्या अर्थाने समाजाशी नाळ घट्ट ठेवत सामाजिक भान जपत विधायक पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचा एक आदर्श आमदार विक्रांत पाटील यांनी प्रस्थापित केला आहे. या अभिष्टचिंतन सोहळ्याला वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर , माजी खासदार संजीव नाईक,आमदार प्रशांत ठाकूर , रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते जे.एम म्हात्रे, माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, भाजयुमो प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपा प्रदेश कामगार आघाडी अध्यक्ष विजय हरगुडे, राहुल लोणीकर, पनवेल विधानसभा क्षेत्रातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर,तसेच महाराष्ट्रभरातून आलेले भारतीय जनता पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्त्युत उपक्रम राबवून जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी-जितेंद्र खोडे**

लोकेश दिवे मित्रपरिवारा तर्फे लोकेश दिवे यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा शाळेत येण्याचा उत्साह वाढावा म्हणून जिल्हा परिषद शाळा चिखली येथे विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले,त्यावेळी विद्यार्थ्यांना कंपास बॉक्स,पेन,अंकलीपी इत्यादी वस्तूचे वाटप करण्यात आले वाटप करताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मन भारावून जावे असे चित्र विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.वयाने लहान असला तरी गावाप्रती जी तळमळ आहे ती या सर्व गोष्टी मधून दिसून येते असे नागरिकांमध्ये चर्चा दिसून येते,या पुढेही असेच लोकहिताचे सामाजिक कार्यक्रम होत राहणार असे लोकेश दिवे मित्रपरिवारा तर्फे सांगण्यात येत आहे,यावेळी लोकेश दिवे मित्र परिवारातील दुर्वेश उमाटे,क्षितिज घायवटे,साहिल वनकर,आकाश वनकर,उपस्थित होते.



# पावला विठ्ठल माझा....! सिल्लोड एसटी आगाराची झोळी भरली, आषाढी वारीत 18 लाख रुपयांचे उत्पन्न

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर
सिल्लोड :- सिल्लोड एसटी आगाराला यंदाच्या पंढरपूर यात्रेमुळे विठ्ठल पावला असून या पंढरपूर यात्रेतून आगारास विक्रमी १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. हे उत्पन्न आतापर्यंतच्या यात्रा उत्पन्नात सर्वाधिक असल्याचे आगारप्रमुख विजयकुमार काळवणे यांनी बोलताना सांगितले.
सिल्लोड आगाराच्या वतीने पंढरपूर यात्रेनिमित्त जय्यत तयारी करण्यात आली होती तालुक्यातील मागील त्या गावातील भाविकांसाठी गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात आली या योजनेचा ७ गावांनी लाभ घेतला होता. यामुळे १२ एसटी बसेस गाड्या ग्रामीण भागातून थेट पंढरपूरला सोडण्यात आल्या होत्या याशिवाय सिल्लोड बस स्थानकावरून पंढरपूर जाणाऱ्या यात्री करून साठी सोडण्यात आलेल्या ज्यादा बसेस मुळे आगाराला यंदा मागील अनेक वर्षांच्या तुलनेत चांगले उत्पन्न मिळाले.
मागील वर्षी सिल्लोड आगाराच्या वतीने पंढरपूर यात्रेसाठी ८४ बस फेऱ्या झाल्या होत्या यातून ३४ हजार २७२ किलोमीटर होऊन ११ लाख ५४११ रुपयाचे उत्पन्न आगारास मिळाले होते. यावेळी ६७१९ प्रवाशांनी पंढरपूर यात्रेचा लाभ घेतला होता.
या वर्षी आगार प्रमुख काळवणे यांच्या योग्य नियोजनानुसार सिल्लोड आगाराकडून १२४ बस फेऱ्या झाल्या यात ४८ हजार २४४ किलोमीटर होऊन यातून १८ लाख ४८७९ रुपयाचे आगारास उत्पन्न मिळाले यासाठी १० हजार २८० प्रवाशांनी प्रवास केला.
सिल्लोड आगाराच्या वतीने पंढरपूर यात्रेसाठी च्या बस नियोजनासाठी मागील पंधरा दिवसांपासून आगारप्रमुख यांचे सोबत स्थानक प्रमुख विकास चव्हाण किरण अवसरमल वाहतूक निरीक्षक जे.यु.राऊत, अशोक काळे, कडुबा गावंडे, हरिओम शेळके आदि अधिकाऱ्यांसह इतर एसटी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.
मागेल त्याला बस योजनेस पंढरपूर जाणाऱ्या भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला याशिवाय माझ्या सहकाऱ्यांनी मला चांगले सहकार्य केल्यामुळे आगाराचे उत्पन्न वाढविण्यात मला यश आले.



## शिवकालीन किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा; नवी मुंबई भाजपाचाच उत्साहात जल्लोष

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले ऐतिहासिक आणि दुर्गरचनात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेले १२ गडकिल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाले आहेत. यानिमित्ताने नवी मुंबई भाजपाच्या वतीने मोठ्या उत्साहात जल्लोष करण्यात आला.वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नवी मुंबई भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जयजयकार करत हा ऐतिहासिक क्षण साजरा करण्यात आला. यावेळी भाजपाच्या युवा मोर्चा, महिला मोर्चा, विविध प्रकोष्ठांचे पदाधिकारी तसेच माजी नगरसेवकांसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.युनेस्कोच्या यादीत समाविष्ट झालेल्या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी आणि जिंजी यांचा समावेश आहे.या ऐतिहासिक निर्णयाबाबत बोलताना डॉ. पाटील म्हणाले, "शिवरायांनी उभारलेले हे गडकिल्ले प्रशासन, संरक्षण आणि राज्यकारभाराचे मूळ तत्त्व शिकवणारे आहेत. युनेस्कोने दिलेला जागतिक वारसा दर्जा हा संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी गर्वाची बाब आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मन:पूर्वक आभार."कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि पारंपरिक वादनाच्या गजरात शिवगर्जना करत उपस्थितांनी ऐतिहासिक क्षण साजरा केला.



# निफाड पूर्व भागातील नापीक क्षेत्राबाबत जलसंपदा मंत्री गंभीर तातडीने पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे
विंचूर :- निफाड तालुक्याच्या पूर्व भागातील कालव्यांच्या गळतीमुळे नापीक झालेल्या शेतजमिनींची तातडीने पाहणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या सचिवांना दिले आहेत. यामध्ये नुकसान भरपाईचा विषय गांभीर्याने विचारात घेतला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

दि.१३ जुलै रोजी लोणी येथे झालेल्या जलसंपदा मंत्र्यांच्या जनता दरबारात निफाड पूर्व भागातील आपदग्रस्त शेतकऱ्यांनी हजेरी लावत आपली कैफियत मांडली. यावेळी उपस्थित शिष्टमंडळाने कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनाही निवेदन सादर केले. कोकाटे यांनी तत्काळ नाशिकच्या मुख्य अभियंत्यांशी संपर्क साधून संबंधित भागाची पाहणी करून योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले.



निफाड पूर्व भागातील खेडलेझुंगे, कोळगाव, रूई, कानळद, देवगाव, शिरवाडे व वाकद या गावांतील सुमारे पाच हजार हेक्टर शेतजमीन कालव्यांमधून झालेल्या गळतीमुळे जलमय होऊन नापीक झाली आहे. यासंदर्भात स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे निवेदन दिले होते. त्यांनीही या भागात भविष्यात शेती अडथळ्यामुळे बाधित होऊ नये यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जातील अशी ग्वाही दिली आहे.

मे-जून महिन्यात झालेल्या पावसासह गोदावरी डावा आणि मराठवाडा जलद कालवा सलग ४५ दिवस सुरू राहिल्याने या भागात भूजलपातळी वाढून शेतजमिनी तलावात रूपांतरित झाल्या आहेत. त्यामुळे उन्हाळी पिके सडली असून खरीप पेरणीही होऊ शकलेली नाही. त्यामुळे हेक्टरी दोन लाख रुपयांची नुकसानभरपाई द्यावी, तसेच कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे, कृष्णा जाधव, लहानु मेमाणे, प्रवीण पगारे, वाळू घोटेकर, दीपक घोटेकर, धनंजय घोटेकर, गणेश घोटेकर आदींच्या सह्या आहेत.

# निफाड शहरात दुचाकी चालकांसाठी कडक तपासणी मोहीम



दैनिक युवक आधार
नाशिक जिल्हा प्रतिनिधी : राहुल कुलकर्णी
निफाड शहरातील वाहतूक पोलिसांकडून दुचाकी स्वारांसाठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येत आहे. निफाड शहरातील शांतीनगर त्रिफुली व उगाव त्रिफुली येथे गर्दीच्या ठिकाणी अचानक नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जात आहे. हेल्मेट न घालणे, वाहनाचे परवाना, विमा व प्रदूषण प्रमाणपत्र नसणे, अशा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड आकारला जात आहे. चोरीचे वाहने पकडण्यासाठी करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. अनेक नागरिकांकडे अद्याप कागदपत्रे पूर्ण नसल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.१२ वाहणावर कार्यवाही करून ९५०० रुपये दंड आकरण्यात आला व ५ मोटार सायकल डिटेन करण्यात आल्या. पोलिसांनी वाहनचालकांना विनंती केली आहे की त्यांनी आपली सर्व कागदपत्रे पूर्ण ठेवावीत व हेल्मेटचा नेहमी वापर करावा. तपासणीमुळे काही ठिकाणी वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत तरीसुद्धा नागरिकांनी पोलीस निरीक्षक गणेश गुरव, फडोल, उप निरक्षक गायकवाड, पो. का. आव्हाड, खुळे, सूर्यवंशी, कावळे, चव्हानके, ढवळे. तपासणी मोहीम पुढील काही दिवस सुरूच राहणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कर्तृत्वाचा गौरव: डॉ. किशोर पाटील यांना राज्यस्तरीय पुरस्कार

## निर्भीड लेखन, सामाजिक भान आणि ग्रामीण पत्रकारितेतील योगदानाची राज्यस्तरीय पातळीवर दखल

. दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर)

मराठी पत्रकारितेतील वैचारिक स्पष्टता, सामाजिक बांधिलकी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवणारे दैनिक 'स्वराज्य तोरण' चे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने गुणगौरव पुरस्कार 2025 ने सन्मानित करण्यात आले. ठाण्यात शनिवार, दि. १२ जुलै २०२५ रोजी टाऊन हॉल, कोर्ट नाका येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळा व पत्रकार मेळाव्याच्या निमित्ताने हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

**हा पुरस्कार म्हणजे केवळ माझा नव्हे, तर ग्रामीण पत्रकारितेत निष्ठेने काम करणाऱ्या प्रत्येक संघर्षशील पत्रकाराचा सन्मान आहे. सत्य व निष्पक्षतेच्या मार्गावर चालणाऱ्या पत्रकारितेची ही थोडीशी पावती आहे. यामुळे अधिक जबाबदारीची जाणीव झाली आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया डॉ. किशोर पाटील यांनी पुरस्कार स्वीकृतीवेळी दिली.**

हा पुरस्कार पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर राज्य कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, सरचिटणीस जगदीश सोनवणे, राज्य उपाध्यक्ष डॉ. दिलीप कोठावदे, कोकण विभाग संघटक अरुण बिराजदार, राज्य सल्लागार प्रमोद इंगळे, ठाणे जिल्हाध्यक्ष शंकर करडे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेंद्र बोडके, आणि कार्यक्रमाचे आयोजक व ठाणे शहर जिल्हाध्यक्ष नितीन मनोहर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. पाटील यांनी गेल्या दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, दुर्लक्षित समाजघटक, तसेच सामान्यांच्या प्रश्नांना आपल्या परखड लेखणीद्वारे वाचा फोडली आहे. सामाजिक अंलबजावणी, शासकीय योजनांची कार्यवाही, प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि राजकीय धोरणांवरील अभ्यासपूर्ण भाष्य ही त्यांच्या पत्रकारितेची ठळक वैशिष्ट्ये ठरली आहेत.
दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक म्हणून त्यांनी केवळ वृत्तसंपादनच नाही, तर समाजप्रबोधनाचे कार्यही सातत्याने केले आहे. त्यांची लेखनशैली ठाम, समतोल आणि सुस्पष्ट असून, वाचकांमध्ये विचारप्रवृत्त करणारी आहे. या गुणवत्तेचीच दखल घेत 'गुणगौरव पुरस्कार 2025' देण्यात आला.
या पुरस्कार सोहळ्याचा उद्देश समाजासाठी कार्य करणाऱ्या डॉक्टर, पोलीस, शिक्षक, वकील, पत्रकार आणि विद्यार्थ्यांसारख्या विविध क्षेत्रातील व्यक्तींना राज्यस्तरावर गौरविणे हा होता. त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळावी, हा यामागचा उद्दात हेतू होता.

या राज्यस्तरीय मेळाव्याचे उत्कृष्ट आयोजन पत्रकार संघाचे राज्य संघटक व ठाणे जिल्हा शहर अध्यक्ष नितीन मनोहर शिंदे आणि त्यांच्या कार्यतत्पर टीमने केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साही आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. ठाणे जिल्ह्यातील विविध माध्यमातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.डॉ. किशोर पाटील यांचा 'गुणगौरव पुरस्कार 2025' हा त्यांच्या मूल्यनिष्ठ पत्रकारितेचा गौरव असून,







हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नाही, तर संपूर्ण ग्रामीण पत्रकारितेच्या सचोटीचा अभिमान असल्याची भावना राज्यभरातून व्यक्त होत आहे.

# 750 आयुष्मान कार्डचे सणसरमध्ये वाटप

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**
महाराष्ट्रातील नागरिकांच्या उपचारासाठी राज्य सरकारकडून महात्मा फुले जनआरोग्य योजनेद्वारे आर्थिक मदत करण्यात येते. केंद्र सरकारनं अशाच प्रकारची योजना देशपातळीवर सुरू केली आहे. 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' असे या योजनेचे नाव आहे.या योजनेंतर्गत नागरिकांना मोफत आरोग्य विमा दिला जातो. भारत सरकारद्वारे राबवली जाणारी प्रमुख आरोग्य विमा योजना अशी या योजनेची ओळख आहे. सरकारी आणि खासगी क्षेत्रातील रुग्णालयांमध्ये उपचारासाठी आयुष्मान भारत



प्रधानमंत्री जनकल्याण योजनेद्वारे विविध उपचारांकरिता मोफत आरोग्य विमा पुरवला जातो. इंदापूर तालुक्यातील सणसर गावात 750 आयुष्मान कार्डचे वाटप झाले आहे. सणसर प्राथमिक आरोग्य केंद्रा मार्फत आयुष्मान कार्ड वाटपाचे नियोजन केले आहे. हे कार्ड शासनाने नियुक्त केलेल्या महाराष्ट्र ब्रँड एजन्सी बारामतीचे मनोज घाडगे,सायली जगताप सणसर प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा वर्कर सुवर्णा कांगळे, दीपाली कुंभार यांच्या मार्फत देण्यात आले.

# थेट छोट्या गावातून विदेशात शिक्षणासाठी झेप!

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-
जितेंद्र खोडे
राळेगाव:- तालुक्यातील पोटगव्हान गावातील साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेली आणि शिक्षणाची जिद्द उराशी बाळगणारी कु भूमिका नरेश गायकवाड हिने आपल्या कर्तृत्वाने थेट ऑस्ट्रेलियापर्यंत झेप घेतली आहे. आपल्या मुलीला चांगले शिक्षण मिळावे म्हणून वडिलांने गाव सोडले आणि वर्धा गाठले तिचे प्राथमिक शिक्षण सेंट अल्फोनसा येथे झाले,शालेय शिक्षण घेत असताना अनेक अडचणींना सामना करावा लागला सतत तीन वर्ष शेतीत दुष्काळ झाल्याने शाळेची फी भरता न आल्याने शाळा व्यवस्थापनाने नोटीस दिली,त्याच वेळी शासनाने शेतकऱ्यांच्या मुलांची शाळा शुल्क माफ करण्याविषयी आदेश काढला परंतु शेतकरी असल्याचा पुरावा शाळेला देणे अपेक्षित होते, त्याकरिता कळंब येथील तहसीलदार यांना विनंती अर्ज केला परंतु संकुचित वृत्ती असलेले तहसीलदार श्री भोसले यांनी "लायकी नसतानां कश्याला मोठ्या शाळेत शिकविता " उद्या बघू म्हणून चालते केले,तेव्हा पोटगव्हाण गावाचे सरपंच श्री संजय मोरे यांनी "देवाने पाठविला गरिबाचा माणूस" अशी ओळख असलेले श्री किशोर तिवारी यांची भेट घडवून आणली आणि किशोर तिवारी यांनी शाळेच्या नावाने धनादेश दिला असे सतत तीन वर्ष त्यांनी आर्थिक मदत केली. त्याचे मोलाचे सहकार्य मिळाले म्हणून मी पुढे शिकू शकले १० वी १२ वी झाल्यानंतर जेईई ही परीक्षा टॉप करून जे डी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग नागपूर येथे प्रवेश मिळवून आय टी शाखेत प्राविण्यासह उत्तीर्ण झाली. त्यानंतर कोणतीही शिकवणी न घेता यु ट्यूब वरील माहिती घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणारी आय एल टी एस परीक्षा पास करून सिडनी विद्यापीठात प्रवेश मिळवून नॅशनल ओवरसिस स्कॉलरशिप अंतर्गत १ करोड ६० लाख रुपयाची स्कॉलरशिप घेणारी जिल्ह्यातून पहिली ठरली आणी भोसले सारख्या संकुचित विचारधारा असणाऱ्यांना जोरदार चपराक



दिली,तिच्या अथक मेहनतीच्या जोरावर ऑस्ट्रेलियातील सिडनी विद्यापीठात ती कॉमर्स एक्स्टेंशन अँड ग्लोबल लॉजिस्टिक या विषयावर संशोधन करणार आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ती आपला आदर्श मानते.तसेच श्री किशोर तिवारी पांढरकवडा व पोटगव्हाण चे सरपंच श्री संजय मोरे यांची मी सदैव ऋणी राहील.येणाऱ्या संकटावर रडत बसण्यापेक्षा संकटावर पाय देऊन आपलं अस्तित्व नव्याने निर्माण करता येऊ शकत अशी ती ठामपणे सांगते, तीच्या यशामागे तिचे पालक,शिक्षक आणी नालंदा अकॅडमी चे श्री कपिल वानखेडे,अनुप सर आणि स्वतःची जिद्द आहे.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत असताना तिने नेहमीच शैक्षणिक प्राविण्य टिकवून ठेवले. तिच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र कौतुक होत आहे."गावातल्या मुलींनी ध्येय निश्चित करून जिद्दीने प्रयत्न केले, तर आकाश ही मर्यादा राहत नाही,"असे मत गावातील माजी सरपंच श्री संजय मोरे यांनी व्यक्त केले.आज केवळ तिच्या कुटुंबाचीच नाही,तर संपूर्ण गावाची आणि जिल्ह्याची शान बनली आहे. तिच्या या प्रवासामुळे इतर ग्रामीण मुलींनाही प्रेरणा मिळेल,अशी अपेक्षा आहे.

# राळेगावात शिंदे गटाला धक्का,संदीप पेंदोर यांच्या नेतृत्वात शेकडो कार्यकर्ते भाजपात

## आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



राळेगावः-राळेगाव तथा जिल्हा प्रमुख मा.श्री प्रफुल्ल चौहाण यांच्या नेतृत्वात प्रतिनिधी शिवसेना शिंदे गटाचे शहर संघटक, सामाजिक चळवळीत सदैव अग्रेसर राहणारे, आदिवासी समाजाचे युवा नेतृत्व संदीप पेंदोर यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना.अशोक उईके यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षात शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश घेतला,शिंदे गटाच्या नेत्यांनी विश्वास गमावलेल्यांना अनेकांना पक्षात प्रवेश दिल्याने प्रामाणिक शिवसैनिकांमध्ये तालुक्यात नाराजीचा सुर उमटत होते. याची परिनीती आज अखेर अनेक शिवसैनिकांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला असल्याची प्रतिक्रिया संदीप पेंदोर यांनी दिली आहे.
अशोक उईके यांच्या नेतृत्वावर व श्री संदीप पेंदार यांचे खंदे समर्थक राळेगाव तालुका शिवसेना शिंदे गट
पक्ष प्रवेश करणारे पदाधिकारी संदीप पेंदोर राष्ट्रीय कर्मचारी सेना शिंदे गट महाराष्ट्र सरचिटनीस तथा शहर संघटक राळेगाव व आदिवासी तालूका प्रमुख,हनुमान शशिवरक शाखा प्रमुख वरूड जहागिर,बंडू संगेवार विभाग प्रमूख झाडगाव,मंगेश ढोके माजी विद्यार्थी सेना तालूका प्रमुख ग्राम पंचायत सदस्य करंज(सो),गणेश बरडे माजी उपजिल्हा प्रमुख विद्यार्थी सेना तथा माजी तंटामुक्ती अध्यक्ष झाडगाव,किसनाजी वैदय माजी सरपंच कळमनेर इत्यादी नी भाजपा पक्षाचे कार्य अधिक जोमाने करणार असल्याचेही त्यांनी यावेळी माध्यमाशी बोलतांना सांगितले आहे.

# शिवस्फूर्ती प्रगती मंडळाच्यावतीने शैक्षणिक साहित्यांचे वाटप

दैनिक युवक आधार
घाटकोपर,(केतन भोज);
सामाजिक,शैक्षणिक,क्रिडा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या घाटकोपर पश्चिम येथील शिवस्फूर्ती प्रगती मंडळ यांच्या वतीने रामनगर नगर (अ ) येथे मंडळाच्या कार्यालयात अध्यक्ष हरेश आण्णा धांद्रुत यांच्या पुढाकाराने तसेच घाटकोपर इन्स्ट्रियल मधील उद्योजक प्रविण तोतरे व प्रकाश पाटील यांच्या सहकार्याने विभागातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख मान्यवर घाटकोपर इन्स्ट्रियल येथील उद्योजक प्रविण तोतरे व प्रकाश पाटील यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच उपस्थित सर्व विद्यार्थांनी ही आपल्यातील कला यावेळी सादर केली.यावेळी या कार्यक्रमाला शिवस्फूर्ती प्रगती मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी देखील उपस्थित होते.



# कै. स्वप्निल टापसे यांचा भिषण अपघातात दुर्देवी मृत्यू..

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी : राजेश भडांगे
विंचूर (नाशिक) : ती सायंकाळ म्हणजे दि. ९ जुलै २०२५ बुधवार ची सायंकाळचे ६:३० वाजेची वेळ कै. स्वप्निल टापसे यांना ठरली अखेरची.. असा अंगाचा भयावह थरकाप करणारी ही घटना. नाशिक येथील वाडीवऱ्हे येथील व्हीटीसी चौफुली जवळ घडली.
स्वप्निल हा जॉब करत असताना इगतपुरी वरून घरी परतत असतांना वाडीवऱ्हे येथील पेट्रोल पंपावर मोटर सायकल ला पेट्रोल भरले आणि आत्ताच दीड महिन्यापूर्वी त्याचे लग्न झाले होते,आणि पत्नीला त्याने



६:०० वाजता फोन करून सांगितले मी अर्ध्या तासात घरी येतो, आणि त्याचा तो फोन अखेरचाच ठरला. आणि पुढे जात असताना व्हीटीसी जवळ स्पीड ब्रेकर जवळ त्याला अज्ञात वाहनाने पाठीमागुन मागून इतका जबर धडक दिली.अशा परिस्थितीत तो रस्त्यावर दोन ते अडीच तास पडलेला होता. त्याला कोणीही मदत केली नव्हती, आणि रात्री ८:०० वाजता त्याला रुग्णवाहिका घ्यायला आली पण त्यावेळेस स्वप्नील या जगाला सोडून गेला होता. नंतर शासकीय रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आलं. हा अपघातच इतका भीषण होता अंगाचा थरकाप करणार होता आणि डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. स्वप्निल चे वय ३४ वर्ष त्याचे बालपण विंचूर येथे सुनील क्षिरसागर या मामाच्या गावी गेले.कारण स्वप्नील ची आई सुद्धा कै. निता टापसे ह्या तो तीसरीत असतानाच त्याला सोडून गेली होत्या. तेथे सर्व शिक्षण संगोपन मामाकडे झाले. आणि उर्वरित शिक्षण नाशिक येथे मावश्या कडे स्वाती वटारे व ज्योती वारे यांच्याकडे राहुन, ब्रह्मा व्हॅली त्रंबकेश्वर येथे एमबीए पूर्ण केले. या घटनेमुळे वारे, वटारे, क्षीरसागर व टापसे कुटुंबीयावर खूप मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. स्वप्निल च्या मागे पत्नी, मामा, मामी, मावश्या, काका, मोठाभाऊ, मामे भाऊ , मावस भाऊ, भावजाई, पुतणी असा परीवार आहे. तसेच या परीवारा कडून अशी मागणी होत आहे कि,सदर हा अपघात झाला ते वाहन कुनी बघीतले असेल तर पत्रकार सुनील क्षिरसागर यांच्या मोबा. ९८२२५८५३०५ या नंबर वर संपर्क करावा अशी दुःखद अंतःकरणाने मागणी केली आहे.

# जे एन पी ए बंदर कामगार संघटना (अंतर्गत)तर्फे कॉम्रेड भूषणजी पाटील यांच्या ६०व्या वाढदिवसाचे अभिष्टचिंतन आणि जे.एन.पी.ए. सेवापूर्ती सन्मान सोहळा संपन्न

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी
२६ मे.१९८९ रोजी जे.एन.पी.ए बंदराचे उद्घाटन स्व. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.तेव्हापासून देशातील एक प्रमुख बंदर म्हणून नावारुपास आले आहे.आणि आता तर आंतरराष्ट्रीय स्तरावर जे एन पी ए बंदराचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.१९९१ मध्ये न्हावा शेवा बंदर कामगार संघटना अंतर्गत या नावाने संघटनेची स्थापना दिवंगत लोकनेते नेते दि.बा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जे एन पी ए कामगारांवर होणारे अन्याय व त्यांच्या हक्कांसाठी,कामगारांसाठी कॉम्रेड भूषण पाटील यांनी कामगारांना एकत्र घेऊन या अंतर्गत युनियनची स्थापना केली. २२ वर्षे कामगार विश्वस्त म्हणून कामगारांच्या हक्कांसाठी, हितासाठी व कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी या सघ्रटनेचे निस्वार्थीपणे नेतृत्व केले. त्यांच्या या सेवेच्या काळात ते ९ वेळा कामगार विश्वस्त म्हणून निवडून आले.

निस्वार्थी, आणि लढवय्ये कामगार नेते कॉम्रेड भूषण पाटील हे विद्यार्थी ,कामगार, शेतकरी ,महिला ,शेतमजूर, आदिवासी, दलित ,पीडित, वंचित, प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र यांच्या हक्कासाठी आयुष्यभर त्यांनी स्वतःच्या घरापेक्षा दुसऱ्याचे संसार वाचवले आहेत. ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त होत आहेत आज १२ जुलै रोजी त्यांचा ६०वा वाढदिवस आहे. आणि सेवानिवृत्ती ३१ जुलै रोजी आहे परंतु आजचा वाढदिवसाच्या निमित्ताने अंतर्गत युनियनने त्यांचा अनेक उपक्रमांनी हा ६० वा वाढदिवस सोबतच सेवानिवृत्ती सोहळा साजरा करण्यात आला.त्यांना स्वताचा वाढदिवस थाटामाटात व भेटवस्तू स्विकारुन साजरा करण्यात स्वारस्य नसल्याने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करुन वाढदिवस साजरा केला आहे.

शनिवार दिनांक १२ जुलै २०२५ रोजी सकाळी साडेदहा वाजता बहुउद्देशीय सभागृह जेएनपीए



टाऊनशिप येथे प्रथम वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ६० फळझाडे व १५ फुलझाडे लावण्यात आली. त्यानंतर शंकरा आय हॉस्पिटल खारघर कडून नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर आदिवासी शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात लोकनेते दि.बा पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सर्व पदाधिकारी आणि कामगारांनी आपले आवडते नेते कॉम्रेड भूषण पाटील यांचे स्वभावातील बारकावे, प्रत्येक कामगारा विषयीचीच नाही तर प्रत्येक गरीब,दुर्बल घटकांविषयी असलेली भावना त्यांच्या विषयीची तळमळ, त्यांच्यासाठी लढण्यासाठी ची त्यांची धडपड असे अनेक विषयांवर आपले मनोगत व्यक्त केले.

मान्यवरांच्या मनोगतानंतर सत्कारमूर्ती कॉम्रेड भूषण पाटील यांनी आपल्या भाषणात कामगाराविषयीचे असलेले प्रेम, व्यक्त करताना यशाचे श्रेय स्वता न घेता कामगारांना दिले, जनशक्ती पेक्षा मोठी शक्ती नाही, संतांचे विचार, जनसेवा हिच ईश्वरसेवा, महान नेते थोर समाजसुधारक , कामगार हे माझे दैवत आहे.,लेनीन, कालमार्क्स यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन कार्य करा. प्रत्येक वाढदिवस सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून साजरा करावा. तसेच सेवानिवृत्तीनंतर युनियन साठी सल्लागार म्हणून काम करणार, भविष्यात अंतर्गत युनियनचाच विश्वस्त झालेला त्यांना पाहायचा आहे. हे करताना यश अपयश हे असणारच आहे अंतर्गत युनियन अजून मोठी होऊन ती नावारुपास आणणे हे त्यांचे स्वप्न आहे. कंत्राटी कामगारांची संघटना करून त्यांना न्याय हक्क मिळवून देण्याचे कर्तव्य आहे. लोकनेते दिवंगत दि बा पाटील साहेबांचे कार्य पुढे नेण्यात नेऊया पुढच्या पिढीला हक्क देऊया घटनेचे संरक्षण करूया लोकशाहीचे रक्षण करूया. अशा शब्दांत त्यांनी आपले मनोगत परखडपणे व्यक्त केले.

आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रममाची सांगतां झाली. कार्यक्रमाच्या ठिकाणी अंतरगत युनियन चे आजी माजी पदाधिकारी व सदस्य, अनेक संघटनांचे पदाधिकारी, जे एन पी ए कामगार, सेवानिवृत्त कामगार, कंत्राटी कामगार , हितचिंतक आदिवासी शाळेतील विद्यार्थी पत्रकार आदी बहुसंख्येने उपस्थित होते. आलेल्या पाहुण्यांसाठी स्नेहभोजन हि ठेवण्यात आले होते.

कामगार नेते कॉम्रेड भूषण पाटील यांचा हा वाढदिवस आणि सेवानिवृत्ती सत्कार सोहळा कार्यक्रम सुंदरीत्या पार पडण्यासाठी अंतर्गत युनियनचे माजी अध्यक्ष किशोर घरत, डेप्युटी जनरल सेक्रेटरी एम एस कोळी ,विद्यमान अध्यक्ष दिनेश घरत, माजीअध्यक्ष गणेश घरत, माजी अध्यक्ष एच यु म्हात्रे, माजी अध्यक्ष प्रशांत भगत ,माजी उपाध्यक्ष मदन पाटील, युनियन पदाधिकारी संदीप पाटील, हिरामण पाटील, नरेश कोळी, उपाध्यक्ष ,एन सी.पाटील, पदाधिकारी जगजीवन भोईर, मान्यवरांमध्ये कामगार नेते मनोज यादव,विजय भोईर, विकास भोईर,संतोष पवार,सुधाकर पाटील,आदि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लक्षणीय होती.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले.

# विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढली पाहिजे असं शिक्षण मिळालं पाहिजे : राज्यपाल हरिभाऊ बागडे

साकोली येथील भारत सभागृहात प्रतिपादन
दैनिक युवक आधार
संजीव भांबोरे

भंडारा _गावाचा स्वर्ग करायचे असेल तर सर्वांनी झटले पाहिजे आम्ही डॉ हेमकृष्ण कापगते व मी जनसंघामध्ये वाढलो जनसंघाच्या शाखा वाढवल्या खूप मेहनत घेतली, परिश्रम घेतले आम्ही काम केल्याने आत्मविश्वास वाढला आणि मेहनत, परिश्रम, संघर्ष केल्याने आत्मविश्वास वाढतो .मान, सन्मान वाढतो व आपोआपच पदे आपल्याला मिळतात .मी राज्यपाल पद मागण्याकडे गेलो नाही आपोआपच पंतप्रधान कडून मला फोन आला व आपल्याला बाहेर राज्यात जावे लागते असे सांगितले गेले .त्यामुळे परिश्रमाचे हे फळ आहेत असे मत राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सांगितले . पुढे ते म्हणाले की ,शिक्षण हे चांगलं असले पाहिजे, विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वाढला पाहिजे, डॉ हेमकृष्ण कापगते यांचे वडील शामराव बापू कापगते तेव्हा मोठ्या अडचणीत त्यांनी जनसंघ उभा केला व चार आमदार निवडून आणले .व महानगरपालिकेच्या उमेदवार निवडून आणले तो आणीबाणीच्या काळ होता. नवे नवे शिक्षण घेतले पाहिजे .आता नवीन शिक्षा पद्धती आली ती आता सर्वांनी अंगीकारलं पाहिजे .विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढली पाहिजे असे मत माजी आमदार डॉ हेमकृष्ण कापगते यांच्या 80 व्या वाढदिवसानिमित्त भारत सभागृह येथे सहस्त्र चंद्र दर्शन सोहळा या कार्यक्रमात राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, यांनी आपले मत व्यक्त केले.

याप्रसंगी भंडारा गोंदिया जिल्ह्याचे खासदार डॉ प्रशांत पडोळे, माजी खासदार सुनील मेंढे, सत्कारमूर्ती डॉ हेमकृष्ण कापगते, माजी खासदार मधुकर कुकडे, आमदार परिणय फुके, सत्कार समितीचे अध्यक्ष रामभाऊ चाचरे, डॉक्टर वसंत भोंडे, किशोर चौधरी, डॉ गजानन डोंगरवार ,व इतरही मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते .
राज्यपाल यांना पोलीस विभागातर्फे मानवंदना देण्यात आली .पोलीस विभागातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. खासदार डॉ प्रशांत पडोळे यांनी सांगितले की, माजी आमदार डॉक्टर हे वृक्षमित्र आहेत त्यांनी कित्येक आरोग्य शिबीर घेतले. एकदम साधे सिम्पल आणि त्यांच्या घराचा संस्कार अतिशय शिस्तबद्ध आहे .अतिशय साधे भोळे स्वतःला श्रीमंतीच्या गौरव नसणारा प्रामाणिक कार्यकर्ताअसे गौरव उद्‌गार त्यांनी काढले.
माजी खासदार सुनील मेंढे यांनी सुद्धा त्यांच्या लहानपणीच्या एक प्रसंग सांगून डॉक्टर साहेब किती साधे भोळे आहेत आणि संघाचे काम कसे प्लॅनिंग पूर्व पद्धतीने करतात त्यांच्या काळात विविध चांगले कामे झालेले आहेत असे मत व्यक्त केले .
आमदार परीनय फुके यांनी सांगितले की ,सेवेसाठी स्वतःला वाहून घेणारा वडेगाव येथे 1989 पासून आरोग्य शिबिर मोफत देणारा सगळ्या क्षेत्रात काम करणारा व एक लाख झाडे संगोपन करणारा एक आदर्श म्हणून आमदार म्हणून ओळखला जातो असे मत परीनय फुके यांनी मांडले.
सत्कारमूर्ती माजी आमदार यांना 80 वर्ष चा वाढदिवस साजरा करण्यात येत आहे असे डॉ हेमकृष्ण कापगते यांनी सांगितले की आम्ही डॉक्टर असताना मृतदेहावर अभ्यास करावा लागत होता त्यामुळे



अभ्यास करताना मृतदेह सुद्धा मिळत नाही म्हणून डॉक्टरच्या उपयोगीत येणारा मृतदेह अभ्यासासाठी असन्या करिता सर्वांनी देहदान , डोळे दान केले पाहिजे, रक्तदान केले पाहिजे असे आव्हान केले.

यापसंगी इतरही मान्यवरांची भाषणे झाली .त्यानंतर समाजसेवक यांच्या विशेष योगदान आहे अशांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये, श्याम झिंगरे ,डॉ प्रतिभा राजहंस, मुरलीधर गजापुरे गुरुजी, पुरुषोत्तम रुखमोडे, साहित्यिक हरिश्चंद्र बोरकर ,पत्रकार अशोक गुप्ता , पक्षीतज्ञ किरण पुरंदरे, पत्रकार डी.जी रंगारी ,प्रबोधनकार भावेश कोटांगले असे 80 लोकांचा सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याचे समितीचे सचिव राजू दुबे यांनी केले . कार्यक्रमाचे संचालन गायधने मॅडम यांनी केले. तर आभार एडवोकेट मनीष कापगते यांनी मानले.
कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रामभाऊ चाचेरे ,राजू दुबे, मनीष कापगते, विजय भाऊराव सखाराम कटरे, केशव मानकर, डॉ प्रतिभा राजहंस, प्रवीण पटेल, गुलाब मेश्राम, कुंदन वलके , व्यंकटेश येवले ,रेखाताई भाजीपाले, अरुण बडोले ,गौरव कावळे ,जनार्दन दोनोडे ,मधु नगरकर ,हिरालाल पारधीकर, दर्शन उंमरे, शंकर हातझाडे व इतरही सर्व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## धर्माबाद येथे दुचाकीला हायवाच्या धडकेने अपघात दुचाकी वरील तिघेजण गंभीर जखमी

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक बाभळी फाटा येथे एका दुचाकीला हायवाने जोरदार धडक दिल्याने अपघात झाला आहे. या अपघातात दुचाकीस्वार शिवशंकर इरवंत पडानपले (वय १२),
सविता इरवंत पडानपले (वय ३५),इरवंत पडानपले (वय ४२) हे राहणार सर्व आलुर बसवन्ना ता. देगलुर जिल्हा नांदेड येथील नागरिक जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताचे कारण अज्ञात असून पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहेत. धर्माबाद तालुक्यात गेल्या काही दिवसापासून वाळू व मोरम अवैधरीत्या चालू आहे. जास्त ट्रिप करण्याच्या नादात हायवा वाहनचालक बेपर्वाईने वाहन चालवितात, ज्यामुळे अपघात होण्याची



शक्यता वाढली आहेत. आठ दिवसापूर्वीच हायव्याच्या अपघाताने एका मुलाचा जीव गेला होता. आता तरी अवैधरित्या व बेपरवाईने वेगाने वाहन चालविणाऱ्यांवर अंकुश लागेल का हा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे.

## वसुंधरा प्राथमिक विद्यालय आष्टीने शिष्यवृत्ती परीक्षेत रचला इतिहास 5 वी आणि 8 वी चे विद्यार्थी राज्यात प्रथम..

दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी – मारुती सत्रे

आष्टीच्या वसुंधरा विद्यालयाने इतिहास घडवला असून एकाच वेळी पाचवी आणि आठवी इयत्तेचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे आजपर्यंत शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता 5 वी व 8 वी मध्ये एकाच वेळी पहिला क्रमांक कुठल्याही शाळेला पटकावता आलेला नाही. असा मान वसुंधरा प्राथमिक विद्यालय आष्टीला मिळाला ही बीड जिल्ह्यासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. दिनांक 9 फेब्रुवारी 2025 रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) चा निकाल काल दिनांक 9 जुलै रोजी जाहीर झाला. वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे इयत्ता 8 वी या वर्गात तीन विद्यार्थ्यांनी
1 कु. संस्कृती सोमनाथ वाळके, 2 हर्ष प्रकाश दाते व 3 सौरभ भैरवनाथ बनकर यांनी राज्य गुणवत्ता यादीत प्रथम स्थान मिळवले. तसेच इ. 5 वी मधून 1 जान्हवी सचिन पवार हीने राज्य गुणवत्ता यादीत प्रथम स्थान मिळवले.

यावर्षी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ 5 वी) मध्ये एकूण 117 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी 116 विद्यार्थी पात्र झाले असून 88 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झालेले आहेत. त्याचबरोबर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. 8 वी) मध्ये एकूण 98 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यातील 97 विद्यार्थी पात्र झाले व 89 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत

आज पर्यंत वसुंधरा प्रशालेचे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. 5 वी) मध्ये 593 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झालेले आहेत व त्यातील 77 विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटकावले आहे. त्याचबरोबर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. 8 वी) मध्ये 437 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत व त्यापैकी 65 विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले आहेत. पूर्व उच्च प्राथमिक परीक्षा (इ. 5 वी) शिष्यवृत्ती धारक झालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे... 1. पवार जान्हवी सचिन 296 (राज्यात प्रथम) हिच्यासह सह 88 विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीधारक हा बहुमान मिळवला आहे.

# लोकसंख्येचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे :-प्रा.डॉ विनायक काळे यांचे प्रतिपादन

## कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात लोकसंख्या दिन संपन्न

दैनिक युवक आधार
नाशिक जिल्हा प्रतिनिधी : राहुल कुलकर्णी

भारताची लोकसंख्या जागतिक क्रमवारीत क्रमांक दोनवर आहे. वाढलेल्या लोकसंख्येचा बाऊ करण्याऐवजी यांचे योग्य व्यवस्थापन केले पाहिजे. लोकसंख्या ही आपली आपत्ती न समजता संपत्ती समजून त्यांचे नियोजन केले पाहिजे. भारत हा तरुणांचा देश आहे त्यामुळे शिक्षित, विविध कौशल्याने प्रशिक्षित तरुण हे आपले कॅपिटल होय. जगाच्या पाठीवर कौशल्य आधारित रोजगाराच्या मोठ्या संधी असून त्यात भारतीय अग्रक्रमाने पुढे जात आहेत. म्हणून हे मनुष्यबळ आपली ताकद आहे. त्यांच्या क्षमतेवरूनच भारत महासत्ता बनणार आहे. असे मत प्रा डॉ विनायक काळे (नाशिक) यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे शुक्रवार दिनांक ११ जुलै रोजी आयोजित लोकसंख्या दिन कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे, प्रा डॉ प्रवीण ढेपले प्रा प्रवीण शार्दुल प्रा डॉ सुसान लॉरेन्सिया,प्रा योगेश कडलग आदी उपस्थित होते प्रा डॉ विनायक काळे पुढे म्हणाले की 2050 नंतर भारताची लोकसंख्या स्थिर असणार आहे त्यामुळे शासनाने कृती



कार्यक्रमातून योग्य पावले उचलली तर लोकसंख्या वाढ रोखता येते. समाजात लोकसंख्या वाढी संदर्भात जनजागृती करणे गरजेचे आहे.तरुणांमध्ये असलेली प्रचंड ऊर्जा, कल्पनाशक्ती, ज्ञान, कौशल्य यांचा सुयोग्य वापर केला तर भारताला निश्चितच फायदा होईल, भारतातील आरोग्य, प्रजननदर जन्मदर, मृत्यूदर, लोकसंख्या याबाबत सांख्यिकीय माहितीच्या आधारे उदाहरणे देऊन लोकसंख्या ही एक नैसर्गिक साधन संपत्ती आहे त्यामुळे कोणत्याही देशाला ती मारक न ठरता सुयोग्य व्यवस्थापनाद्वारे ती तारक ठरेल. समाजातून सुसंस्कारित पिढी घडली पाहिजे. कुटुंब शाळा महाविद्यालय यासाठी प्रयत्नशील असतात. असे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी अध्यक्षीय मनोगतात भारतातील लोकसंख्य आता जगात अव्वल स्थानावर आहे परंतु या अतिरिक्त लोकसंख्येचा आपण विधायक कार्यासाठी देशाच्या विकासासाठी कशाप्रकारे उपयोग करू शकतो याचा विचार झाला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात पृथ्वी गोल पूजनाने झाली. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण शार्दुल यांनी केले तर आभार प्रा. गोकुळ सानप यांनी मानले, कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ.प्रवीण ढेपले डॉ.आर. डी. शिंदे, डॉ. महेश बनकर, प्रा. नरेश सोनटक्के, श्रीमती प्रियंका धारराव, मोनिका बोराडे, चित्रा कापसे, प्रा.प्रशांत आव्हाड व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी धीरज बिराडे, राहुल चांदोरे, सोपान मोरे व रावसाहेब पवार यांनी परिश्रम घेतले.

# मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करा; गणेशोत्सवापूर्वी कामे पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा
------------
मुंबई–गोवा महामार्गावर अपूर्ण कामे आणि उघड्यावर राहिलेले खड्डे यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. आगामी



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या लाखो चाकरमान्यांचा प्रवास सुरक्षित आणि सुलभ व्हावा यासाठी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला ठोस निर्देश दिले आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महामार्गाच्या कामाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक यशवंत घोटकर, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीकांत गायकवाड, वाहतूक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे आदी अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, "गणेशोत्सव काळात होणारी वाहनांची गर्दी लक्षात घेता, महामार्गावरील सर्व खड्डे तात्काळ बुजवावेत. अपूर्ण असलेले बायपास, सर्व्हिस रोड, भुयारी मार्ग आणि साईड पट्ट्यांचे काम तातडीने पूर्ण करावे. तसेच दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर आणि सुरक्षेसाठी आवश्यक त्या ठिकाणी जाळ्या बसवाव्यात."वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना माणगाव आणि इंदापूर या शहरांमध्ये गणेशोत्सव काळात होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता, संबंधित यंत्रणांनी ट्रॅफिक वॉर्डन नेमावेत, असेही आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.महामार्गावर अपघात वाढण्यामागील मुख्य कारण म्हणजे कामातील अनियमितता आणि वेळेवर न झालेली कामे असल्याचे निरीक्षण बैठकीत नोंदवण्यात आले. त्यामुळे कामे पूर्ण झाली की नाही याची खातरजमा करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही जिल्हाधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले.

# तळोजा येथील युवकांचा शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश

### मराठी माणसाच्या संघर्षात शिवसेना ; शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक उभे..रामदास शेवाळे

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी वार्ताहर

वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण आणि शिवसेना मुख्य नेते व मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार पनवेल रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे




यांच्या मार्गदर्शनाखाली तळोजा शहरप्रमुख विशाल पवार व घोटगाव विभागप्रमुख आशिष हवालदार यांच्या संकल्पनेतून पनवेल विधानसभा – तळोजा विभागातील युवकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी आशुतोष महेश्वरी,रितेश बर्डे,नवीन आर्य,मुसफता भारमल,आफताब कच्ची,साहिल कदम,सार्थक शिर्के मोहम्मद खोत,तिरुमूर्ती सुमित शिवगाडगे,इम्तियाज शहा,मुकेश प्रसाद,आयुष रानवा,,वैभव पाटील,शुभम दोंड,मनिंदर सिंग,नमिष चोपडे,आकाश जैस्वाल,प्रफुला गौडा,विजय कुमार,अभिषेक पांडे व अन्य युवकांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, कळंबोली. रामदास शेवाळे साहेब (जिल्हा प्रमुख – पनवेल, रायगड) यांच्या हस्ते शिवसेना पेक्षाचा झेंडा हाथी घेतला.या वेळी तळोजा फेज २ चे उपविभाग प्रमुख इर्शाद शेख, तळोजा फेज २ चे शाखा प्रमुख गुरमित सिंग बमराह व अन्य शिवसैनिक पदाधिकारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला .